


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १९१ वा शनिवार दि १३ सप्टेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# जय शाहांनासुद्धा देशद्रोही म्हणणार का?

## पहलगाममधील रक्तही सुकलं नाही;भारत पाक सामन्यावरून ठाकरेंचा मोदींना सवाल...

**वृत्तसंस्था/मुंबई**

पंतप्रधान मोदींनी बाहेर देशात शिष्ट मंडळ पाठवण्यापेक्षा भारत-पाक सामनेर बहिष्कार टाकणं हे मोठे ठरलं असतं. उद्या सकाळी ११ वाजता सर्व महिला जमणार असून एकाच मोठ्या डब्यामध्ये सिंदूरच्या पुड्या पाठवणार आहेत. अजूनही वेळ गेलेली नाही मोदींनी दमदारपणे सांगितलं पाहिजे हा सामना होणार नाही. मला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रश्न विचारायचा आहे की, तुमच्या आजूबाजूला बसलेले जे अंडू पांडू लोक आहेत, जय शाहसुद्धा ज्याप्रकारे नीरज चोप्राला तुम्ही देशद्रोही म्हणाले त्याच प्रकारे तुम्ही जय शाहसुद्धा देशद्रोही म्हणणार का? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला आहे. पहलगाममध्ये जो हल्ला झाला त्यामधील मृतांचं रक्तही अजून सुकलेलं नाही, तो घाव अजूनही भरलेला नाही. त्यावेळी आपल्या सर्वांना असं वाटलं होतं की आता पाकिस्तानला जागेवर ठेवणार नाही. पाकिस्तानचे दोन-तीन तुकडे करू, त्या दृष्टीने एक युद्ध केला गेला आणि त्याला नाव ठेवण्यात आलं होतं ऑपरेशन सिंदूर. संरक्षण मंत्र्यांनी हे सांगितलं होतं की अजूनही ऑपरेशन सिंदूर हे सुरू आहे, पाकिस्तान नेहमी नेहमी काही दिवसांनी आपला हल्ला करतात त्यावेळी आपले सैनिक शौर्य दाखवतात. अमेरिकेचे राष्ट्रपती ट्रम्प म्हणतात की त्यांनी हे युद्ध थांबवलं, भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्रा याने पाकिस्तानच्या एका प्रशिक्षकाला भारतामध्ये आमंत्रण दिलं होतं. तो प्रशिक्षक आलेला की नाही याबद्दल माहिती नाही पण त्या नीरज चोप्रांना काही अंधभक्तांनी देशद्रोही म्हटलं होतं, असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. ज्या पाकिस्तान सोबत आपण युद्ध पुकारलं होतं त्याच पाकिस्तान सोबत आपण मॅच खेळत आहोत. ऑपरेशन सिंदूर झाल्यावर मोदींनी




सर्व ते जगात सर्वपक्षीय खासदारांना पाठवला होता आणि पाकिस्तान आमच्या इथे दहशतवाद पसरवत आहे हे सांगितलं होतं. आता उद्याच्या सामन्यावर मोदीजींचं काय म्हणणं आहे. मला वाटतं ही देशभक्तीची कट्टा असून व्यापार चालला आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग आणि गृहमंत्री अमित शहा हे युद्ध थांबलो असं जाहीर करणार आहेत का? असंही ठाकरे म्हणाले आहेत.

# उद्या इतिहास घडणार... आपण साक्षीदार होऊ या !!

**जनसंचलन/बुलढाणा**

पत्रकार संघटनांची मातृसंस्था असलेल्या आणि ८७ वर्षांचा पत्रचळवळीचा दैदीप्यमान इतिहास असलेल्या मराठी पत्रकार परिषदेने काळाची पाऊले ओळखून टीव्ही न्यूज चॅनेल, यु ट्यूबर, वेब पोर्टल, एफएम न्यूज वाहिनी आदींसाठी हक्काचे व्यासपीठ म्हणून आपल्या अंतर्गत ङ्कङ्कडिजिटल मीडिया परिषदङ्कङ्क विंग सुरु केली आहे. सदर परिषदेचे पहिले राज्यव्यापी अधिवेशन उद्या, १४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर मध्ये संत एकनाथ रंगमंदिर या ठिकाणी होत आहेत. डिजिटल मिडियातील पत्रकारांची संख्या उत्तरोत्तर वाढत असून त्यांना संघटीत करून त्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीबाबत अधिवेशनात विचार विनिमय करून ठोस भूमिका घेतली जाणार आहे. संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट आणि कॅबिनेट मंत्री अतुलजी सावे यांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन होणार असून एस.एम.देशमुख अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी असतील. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. मुक्तपीठङ्कङ्क चे संपादक आणि नवा काळचे सल्लागार संपादक तुळशीदास भोईटे आणि ङ्कङ्कअभिव्यक्तीङ्कङ्क युट्यूब चॅनलचे संपादक रवींद्र पोखरकर मुख्य वक्ते म्हणून उपस्थित पत्रकारांना मार्गदर्शन करणार आहेत.*

*डिजिटल आणि प्रिन्ट मिडियातील पत्रकारांनी अधिवेशनास मोठ्या संख्येनं उपस्थित राहावे असे आवाहन परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई, डिजिटल मिडिया परिषदेचे अध्यक्ष अनिल वाघमारे, कार्यक्रमाचे संयोजक तथा संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष बालाजी सूर्यवंशी यांनी केले आहे. अधिवेशनात उत्कृष्ट युट्यूब चॅनल चालवून ते यशस्वी करून दाखविणाऱ्या काही संपादकांचा सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती अनिल वाघमारे यांनी दिली. बुलढाणा जिल्ह्यातून मोठ्या संख्येने डिजिटल मीडिया परिषदेचे पदाधिकारीआणि सदस्य संभाजीनगरला जात आहेत. बुलढाणा जिल्हा पत्रकार संघांचे अध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनात आणि परिषदेचे विभागीय सचिव जितेंद्र कायस्थ यांच्या नेतृत्वात टीव्ही ९ चे जिल्हा प्रतिनिधी गणेशजी सोळंकी यांची



नुकतीच बुलढाणा डिजिटल मीडिया परिषदेचे अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. अध्यक्ष गणेशजी सोळंकी यांच्या कुशल नियोजनात आणि सचिव दिपकजी मोरे यांच्या व्यवस्थापनात एक वातानुकूलित लक्झरी बस उद्या, १४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ७ वाजता बुलढाणा जिल्हा पत्रकार भवन येथून संभाजीनगरसाठी रवाना होत आहे. येण्यासाठी इच्छुक असलेल्या पत्रकारांनी संपर्क करावा, असे आवाहन बुलढाणा डिजिटल मीडिया परिषदेचे विभागीय सचिव जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४, अध्यक्ष गणेश सोळंकी ९९७५२९६१२३, सचिव दीपक मोरे ९६७३७४७३२३ तसेच बुलढाणा जिल्हा पत्रकार संघ कार्यकारिणीने केले आहे. अभिमान बाळगा आपण सर्वात जुन्या आणि सशक्त संघटन असलेल्या मराठी पत्रकार परिषदेचे सदस्य आहोत

# सोनियाचा भाव गेला गगनवेरी...

## संपादकीय लेख

सोन्याच्या भावात सध्या वेगाने वाढ होत आहे. २४ कॅरेट सोने आता किरकोळ स्तरावर कर आणि घडणावळीसह १० ग्रॅमसाठी सरासरी एक लाख १३ हजार रुपयांवर पोहोचले आहे. याच २४ कॅरेट सोन्याचा १० ग्रॅमसाठीचा किंवा एक तोळ्याचा २०१६मधील भाव पाहिला तर तो सरासरी २८,५०० रुपये होता. हाच भाव आज कर व घडणावळ वगळता सरासरी १,०९,००० रुपयांपर्यंत गेला आहे. सोन्याप्रमाणे चांदीही एका किलोसाठी एक लाख २५ हजार रुपयांवर गेली आहे. या दोन्ही मौल्यवान धातूंच्या किंमतींतील वाढीचा वेग हा साधारणतः २०२३पासून वाढलेला आपल्याला दिसेल. याची कारणे अनेक. करोना संकटानंतर हौती अतिरेक्यांकडून सुवेझ कालवा ताब्यात घेऊन जागतिक व्यापाराला वेठीस धरणे, हमास-इस्रायल युद्ध, रशिया-युक्रेन युद्ध यामुळे जगात सातत्याने अशांत वातावरण आहे. पोलंड, फ्रान्स, नेपाळ या देशांतही अशांतता आहे. आर्थिक अशांततेचे पर्यवसान महागाईत होते. कोणत्याही देशात महागाईने कहर केल्यास त्या देशाचे चलन घसरते. अशा वेळी सोने मात्र त्याची किंमत राखून असते. म्हणून कोणत्याही देशाची मध्यवर्ती बँक एकंदर अशांततेची चाहूल लागताच मोठ्या प्रमाणावर सोने खरेदी करू लागते. भारतात सणासुदीचा आणि लग्नसराईचा काळ हा सोनेखरेदीचा काळ मानला जातो. सोन्याचा भाव असाच विक्रमी राहिला तर मात्र सोने कमी प्रमाणावर खरेदी केले जाईल, ज्याचा फटका दागिने उद्योगाला बसेल. सोन्याचा भाव वाढण्यामागे आणखी एक महत्त्वाचे कारण आहे. ते म्हणजे अमेरिकी डॉलरसमोर सातत्याने घसरणारा रुपया. रुपया जितका घसरत जाईल तितकी आयात केल्या जाणाऱ्या




सोन्याची किंमत वाढत राहील. यामुळे किरकोळ स्तरावर ग्राहकाला सोने आणखी महाग मिळेल. एकंदरीत पाहता, हे असेच सुरू राहिल्यास सोने दिवाळीपर्यंत सव्वा लाख रुपयांपार जाईल आणि चांदी दीड लाख रुपयांपार, अशी शक्यता देशातील सराफ व्यक्त करू लागले आहेत. सोन्याकडे आयत्यावेळची पैशाची बेगमी, हेजिंग साधन, सहज मोडून नवा दागिना घडवण्यासाठी सोपा धातू अशा रूपांत बघतानाच त्याकडे गुंतवणुकीचे साधन म्हणूनही पाहायला शिकणे ही काळाची खरी गरज आहे.





*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# नागपुरात स्कूलव्हॅन अन् बसचा भीषण अपघात;

# विद्यार्थिनीसह चालक ठार, ८ विद्यार्थी जखमी

**नागपूर:** स्कूलबस आणि स्कूलव्हॅनची एकमेकांना जबर धडक बसून झालेल्या अपघातात व्हॅनचा चालक व त्यातीलच विद्यार्थिनी असे दोघे जण ठार झाले. तर सहा विद्यार्थी जखमी झाले. ही थरारक तेवढीच हृदयद्रावक घटना मानकापूर उड्डाणपुलावर शुक्रवारी सकाळी ८.३० वाजताच्या सुमारास घडली. हा अपघात एवढा भीषण होता की, व्हॅन चकनाचूर झाली. तिच्या केबिनमध्ये फसलेल्या चालकाला महत्प्रयासाने बाहेर काढण्यात आले.मृतांमध्ये ऋतिक कनोजिया (२४) हा स्कूलव्हॅनचालक तसेच सान्वी खोब्रागडे (१४) या विद्यार्थिनीचा समावेश आहे. तर सान्वीचा धाकटा भाऊ आदिराज (९) याच्या पायाला फ्रॅक्चर झाले. त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. चौथीची विद्यार्थिनी काव्या केदार हिच्यावरही शस्त्रक्रिया करण्यात आली. दोघेही आणखी काही दिवस रुग्णालयात राहण्याची शक्यता आहे. रेहान्शिका शेंडे हिला किरकोळ दुखापत झाली, तिला रुग्णालयातून सुटी देण्यात आली. यश मिश्रा (१३), हृदया सूर्यवंशी, स्वयम ठाकरे (१०) अशी अन्य जखमींची नावे आहेत.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, हा सकाळी ८.३० वाजताच्या सुमारास कनोजियाची स्कूलव्हॅन कोराडी रोड शाखेच्या भवन्स भगवानदास पुरोहित विद्यामंदिरच्या नऊ विद्यार्थ्यांना घेऊन जात होती. समोरून नारायणा विद्यालयाची स्कूलबस येत होती. व्हॅन व बस एकमेकींवर धडकल्या. ही बस विद्यार्थ्यांना घेण्यासाठी जात होती.




त्यामुळे या बसमध्ये चालक आणि दोन महिला परिचारिकाच होत्या. या तिघांना कुठलीही दुखापत झाली नाही. मात्र, व्हॅनचा चालक कनोजिया आणि त्याच्या मागे बसलेली सान्वी दोघेही गंभीर जखमी झाले.या घटनेने व्हॅनमधील इतर जखमी विद्यार्थी हादरले, रडू लागले. काही बेशुद्ध पडले.

घटनास्थळी मोठी गर्दी झाली. नागरिकांनी आपली वाहने थांबवून विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी धाव घेतली. केबिनमध्ये फसलेल्या कनोजियाला बाहेर काढताना बरेच प्रयत्न करावे लागले. नागरिकांनी व्हॅनच्या काचा फोडून काही बेशुद्ध मुलांना उचलले व नजीकच्या कुणाल रुग्णालयात दाखल केले. कनोजियाला मेयो रुग्णालयात दाखल करण्यात आले.पोट आणि डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा दुपारी १.३० वाजताच्या सुमारास उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर, बेशुद्धावस्थेतील सान्वीला एका खासगी रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात हलविण्यात आले. तेथे तिला व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले. ङ्गतिच्या श्रोणीला (पेल्विक) फ्रॅक्चर झाले होते. तसेच तिची मुख्य रक्तवाहिनी फाटली होती. सर्वतोपरी प्रयत्न करूनही तिला वाचवता आले नाहीफ, असे डॉक्टरांनी सांगितले. सायंकाळी सान्वीचा मृत्यू झाला. दरम्यान, तिच्या अपघाताची माहिती मिळताच तिचे वडील तातडीने पुण्याहून नागपूरला दाखल झाले. मुलीच्या मृत्यूमुळे तिचे पालक काहीही बोलण्याच्या मन:स्थितीत नव्हते. सान्वीच्या जाण्याने तसेच मुलगा आदिराज जखमी असल्याने त्यांच्यावर दु:खाचा डोंगर कोसळला.


कनोजिया गेल्या तीन वर्षांपासून स्कूलव्हॅन चालवत होता. तो मेहनती आणि घरात एकमेव कमावता होता, असे त्याच्या कुटुंबीयांनी सांगितले. त्याच्यापश्चात आई-वडील आणि दोन मोठ्या बहिणी आहेत.

## ओमानविरुद्ध जिंकताच पाक कॅप्टनची भारताला वॉर्निंग; टीम इंडियाला दिलं ओपन चॅलेंज; काय बरळला?

**दुबई:** आशिया कप २०२५ च्या ग्रुप अ सामन्यात पाकिस्तानने ओमानचा ९३ धावांनी पराभव केला. या सामन्यात पाकिस्तानने प्रथम फलंदाजी केली आणि १६० धावा केल्या. प्रत्युत्तरात संपूर्ण ओमान संघ फक्त ६७ धावांवरच बाद झाला. टीम इंडियाविरुद्धच्या सामन्यापूर्वी पाकिस्तान संघाचे मनोबल निश्चितच उंचावेल. अशा परिस्थितीत, पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आगाने या विजयानंतर मोठे विधान केले. पाकिस्तान संघाच्या कर्णधारा चा असा विश्वास आहे की, ङ्गङ्घआम्हाला अजूनही फलंदाजीत काही सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. गोलंदाजी उत्कृष्ट होती, मी गोलंदाजी युनिटवर खूश आहे. आमच्याकडे तीन फिरकीपटू आहेत आणि ते सर्व वेगळे आहेत, अगदी अयुब देखील. आमच्याकडे ४-५ चांगले पर्याय आहेत आणि दुबई आणि अबू धाबीमध्ये खेळताना आम्हाला त्यांची आवश्यकता आहे. आम्हाला सुरुवातीपासूनच १८० धावा करायला हव्या होत्या पण क्रिकेट असेच आहे. आम्ही खरोखर चांगले क्रिकेट खेळत आहोत. आम्ही तिरंगी मालिका जिंकली आणि इथेही सहज जिंकलो. जर आम्ही आमच्या योजना दीर्घकाळ राबवत राहिलो तर आम्ही कोणत्याही संघाला हरवू शकतो.ङ्घङ्घ पाकिस्तानच्या कर्णधारचा या विजयानंतर भलताच आत्मविश्वास वाढलेला पाहायला मिळत आहे.मोहम्मद हॅरिसच्या ६६ धावांच्या खेळी आणि गोलंदाजांच्या प्रभावी कामगिरीनंतर, शुक्रवारी येथे आशिया कप टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात ओमानवर ९३ धावांनी मोठा विजय मिळवून पाकिस्तानने आपल्या मोहिमेची सुरुवात केली. सात विकेट्सवर १६० धावा केल्यानंतर, पाकिस्तानने ओमानचा डाव १६.४ षटकांत ६७ धावांत गुंडाळून मोठा विजय नोंदवला.पाकिस्तान आता १४ सप्टेंबर रोजी ग्रुप अ मध्ये भारताचा सामना करेल आणि या विजयामुळे संघाचा आत्मविश्वास थोडा वाढेल. ओमानकडून हम्माद मिर्झा यांनी सर्वाधिक २७ धावा केल्या. त्याच्याशिवाय, फक्त आमिर कलीम (१३) आणि शकील अहमद (१०) दुहेरी अंकात धावा करू शकले. पाकिस्तानकडून फहीम अश्रफ, सैम अयुब आणि सुफयान मुकीम यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या.



## जिममध्ये चक्कर येऊन कोसळली, अवघ्या २० वर्षीय प्रियंकाचा हार्ट अटॅकने मृत्यू



**छत्रपती संभाजीनगर :** आई बाहेर गेली असल्याने वडिलांना चहा करून दिल्यानंतर भाऊ, मैत्रिणीसह जिमला गेलेल्या २० वर्षीय तरुणी जिममध्ये अचानक चक्कर येऊन पडली. हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असताना हृदयविकाराचा झटका येऊन तिचा मृत्यू झाला. ही घटना बीड बायपास परिसरात गुरुवारी सायंकाळी घडली. एकुलती एक मुलगी गमावल्याने कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला.प्रियंका अनिल खरात वय २० वर्ष, रा. बीड बायपास, असं मयत झालेल्या मुलीचे नाव आहे. प्रियंकाने बीफार्मसीचे पदवीपर्यंत शिक्षण पूर्ण केले आहे. बीड बायपास परिसरातील मस्के पेट्रोल पंप शहरजवळ एका अपार्टमेंटमध्ये खरात कुटुंबीय राहते. अनिल खरात हे देवगाव रंगारी येथे पोलीस हवालदार म्हणून नोकरी करतात. अनिल खरात यांना प्रियंका आणि यश अशी दोन मुले आहेत.दरम्यान गुरुवारी सायंकाळच्या सुमारास आई बाहेर गेली असल्याने प्रियंकाने वडिलांना चहा करून दिला. महिनाभरापासून प्रियंकाने जिम जॉईन केलं होतं. त्यामुळे सायंकाळच्या सुमारास मी जिमला जाऊन येते असं सांगून ती घरातून निघाली. तिच्यासोबत भाऊ यश व मैत्रीण प्रणाली कुलकर्णी सोबत होते.जिममध्ये जाताना तिघे जण हसत खेळत गेले. आनंदाने प्रियंकाने व्यायाम केला. भावाची वाट बघत असताना प्रियंकाला अचानक चक्कर आली त्यानंतर ती खाली कोसळली. यामुळे तिला तात्काळ खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असताना प्रियंकाला अचानक हृदयविकाराचा झटका आला यात तिचा मृत्यू झाला. सायंकाळी गादिया विहार येथील स्मशानभूमीमध्ये तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले

# परदेशी तरुणीवर गोव्यात अत्याचार, सोलापुरातून २८ वर्षीय डॉक्टरला अटक, तपासणीच्या नावाखाली...




**सोलापूर :** परदेशी महिलेवर बलात्कार केल्याप्रकरणी गोवा पोलिसांनी एका डॉक्टरला अटक केली आहे. पीडित २४ वर्षीय तरुण मूळ मोरोक्को देशाची रहिवासी आहे,

तर वृषभ दोशी असे २८ वर्षीय आरोपी डॉक्टरचे नाव आहे. उपचारांसाठी ती गोव्यातील एका खाजगी हॉस्पिटलमध्ये आली होती. यावेळी ती आयसीयूमध्ये असताना वृषभने तिच्यावर अतिप्रसंग केल्याचा आरोप आहे. पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना गुरुवारी पोलिसांनी वृषभला सोलापूर येथून अटक केली. वृषभ दोशी मूळ सोलापूरचा आहे. पोलिसांनी त्याच्याविरुद्ध बलात्कार आणि इतर कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. न्यायालयाने त्याला एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.पोलिसांनी सांगितले की, पीडितेच्या आरोपानुसार ती काही जणांसोबत च्या एका ट्रेनिंग प्रोग्रामसाठी बिझनेस व्हिसावर गोव्यात आली होती. हे दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी काम करते. ट्रेनिंग दिवर बेटावर होते. ती दिवरमधील एका रिसॉर्टमध्ये थांबली होती. तिथे तिची तब्येत बिघडली. त्यामुळे तिला जुन्या गोव्यातील एका खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.तिच्या स्पॅनिश बहिणीने तक्रार केली की, ३१ ऑगस्ट रोजी रात्री १० वाजता हॉस्पिटलमध्ये आरोपी दोशीने तिच्या बहिणीचा लैंगिक छळ केला.

पीडिता २९ ऑगस्ट रोजी हॉस्पिटलमध्ये दाखल झाली. मध्ये उपचार घेत असताना, डॉक्टरने तिचे हॉस्पिटलचा गाऊन वर केला आणि तिला चुकीच्या पद्धतीने स्पर्श केला.तक्रारीत म्हटले आहे की, डॉक्टरने करण्याच्या नावाखाली तिच्या प्रायव्हेट भागांना स्पर्श केला. त्यावेळी आयसीयूत असल्याने ती असहाय्य अवस्थेत होती.उत्तर गोव्याचे राहुल गुप्ता यांनी सांगितले की, वृषभ दोशी गुन्हा केल्यानंतर गोव्यामधून पळून गेला होता. आम्ही एक टीम तयार केली. त्याला सोलापूरमध्ये शोधून अटक केली. त्याच्याविरुद्ध च्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. यात बलात्काराचाही समावेश आहे,ङ्कङ्क असे ते म्हणाले.दरम्यान, हॉस्पिटलने एक निवेदन जारी करत म्हटले आहे की, हेल्थवे हॉस्पिटलमध्ये दाखल असलेल्या एका महिलेने डॉ. व्ही. दोशी यांच्याविरोधात लैंगिक अत्याचाराची तक्रार केली आहे. तक्रार मिळाल्यानंतर डॉक्टरला निलंबित करण्यात आले आहे. हॉस्पिटलने तिला पूर्ण पाठिंबा दर्शवला आहे. पोलिसांनी तक्रार दाखल करण्यासाठी तिला मदत केली. ती अजूनही हेल्थवे हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहे. हॉस्पिटल तिला या कठीण काळात पूर्ण मदत करेलङ्कङ्क असेही हॉस्पिटलने म्हटले आहे. या घटनेमुळे गोव्यात खळबळ उडाली असून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे

# कारमध्ये बसताच निघाला धूर, न्यायाधीशांच्या गाडीला अचानक आग, कोर्टाबाहेर मोठी तारांबळ



**नागपूर :** नागपूर जिल्हा सत्र न्यायालय परिसराबाहेर शुक्रवारी संध्याकाळी मोठी घटना घडली. न्यायाधीश श्रीधर मौदेकर यांच्या कारला अचानक भीषण आग लागल्याने परिसरात क्षणभरातच खळबळ उडाली. मात्र प्रसंगावधानाने आणि दमकल दलाच्या तत्परतेने मोठा अनर्थ टळला. मिळालेल्या माहितीनुसार, न्यायालयीन कामकाज आटोपून श्रीधर मौदेकर आपल्या इंडिगो कारने घरी जात होते. दरम्यान आकाशवाणी चौकात यू-टर्न घेताना चालकाच्या लक्षात आले की गाडीतून धूर निघत आहे. हे दिसताच चालकाने प्रसंगावधान दाखवत तत्काळ रस्त्याच्या कडेला गाडी उभी केली आणि न्यायाधीशांसह बाहेर उतरले. काही क्षणातच गाडीला अचानक आग लागली.घटनास्थळी तैनात असलेल्या पोलीस हवालदार सुनील तिवारी यांनी तातडीने अग्निशमन विभागाला कळविले. त्यानंतर काही वेळातच अग्निशम दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आणि त्यांनी अथक प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले. आगीमुळे पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या इतर वाहनांपर्यंत ज्वाळा पोहोचण्याचा धोका होता. मात्र, अग्निशमन कर्मचाऱ्यांच्या तत्परतेने ते टळले आणि परिसरातील इतर वाहने सुरक्षित राहिली.घटनेच्या वेळी परिसरात वकील, न्यायालयीन कर्मचारी तसेच नागरिकांची मोठी गर्दी होती. गाडीला लागलेली आग पाहून परिसरात क्षणभरात अफरातफरीचे वातावरण निर्माण झाले होते. सध्या गाडीला लागलेल्या आगीचे नेमके कारण स्पष्ट झालेले नाही. काही तांत्रिक बिघाडामुळे आग लागली असावी, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, गाडीला आग कशी लागली याचा पोलीस आणि अग्निशमन विभागाने तपास सुरू केला आहे.ही घटना न्यायालय परिसरात घडल्याने सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. परिसरात रोज शेकडो वाहनांची वर्दळ असते. जर वेळेवर आग नियंत्रणात आणण्यात आली नसती तर मोठा स्फोट किंवा इतर वाहनांना आग लागून गंभीर दुर्घटना घडली असती. त्यामुळे मौदेकर आणि त्यांच्या चालकाने दाखवलेले प्रसंगावधान तसेच अग्निशमन विभागाची वेगवान कारवाई यामुळे एक मोठा अनर्थ टळला.


# मान्सूनचा १५ सप्टेंबरपासून परतीचा प्रवास; आगामी ३ दिवस राज्यात सर्वदूर पावसाची शक्यता



**मुंबई :** यंदाच्या मान्सूनचा परतीचा प्रवास येत्या १५ सप्टेंबरपासून सुरू होणार असल्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) शुक्रवारी वर्तवला. दुसरीकडे बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे राज्यात पुढील तीन दिवस सर्वदूर पावसाची शक्यता असल्याचेही विभागाने म्हटले आहे. पश्चिम राजस्थानातून मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू होण्याची सर्वसाधारण तारीख १७ सप्टेंबर आहे. राजस्थानवर वातावरणाच्या खालच्या थरात जास्त दाबाचे क्षेत्र तयार होतानाच सलग पाच दिवस कोरडे हवामान नोंदले गेल्यास मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू झाल्याचे जाहीर केले जाते. यंदा सर्वसाधारण तारखेच्या दोन दिवस आधीच मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू होऊ शकतो, असे हवामान विभागाने प्रसिद्ध केलेल्या अंदाजात म्हटले आहे.आयएमडीने दिलेल्या माहितीनुसार, वायव्य आणि लगतच्या मध्य बंगालच्या उपसागरात शुक्रवारी कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले. हे क्षेत्र पुढील दोन दिवसांत दक्षिण ओडिशा आणि दक्षिण छत्तीसगडकडे सरकण्याची शक्यता आहे. या क्षेत्राच्या प्रभावामुळे १३ सप्टेंबरला मराठवाड्यात, तर १४ आणि १५ सप्टेंबरला मध्य महाराष्ट्र आणि कोकणात सर्वदूर पावसाची शक्यता आहे.आयएमडीच्या लघु आणि मध्यमकालीन अंदाजानुसार सध्याच्या कमी दाबाच्या क्षेत्रापाठोपाठ बंगालच्या उपसागरात २० सप्टेंबरच्या दरम्यान आणखी एक कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. त्या क्षेत्रामुळे राज्यातील पावसात पुन्हा वाढ होऊ शकते. राज्यातून मान्सून माघारी फिरण्याचा सर्वसाधारण कालावधी ५ ते १४ ऑक्टोबर आहे. पावसाची सध्याची स्थिती पाहता राज्यातून मान्सून सर्वसाधारण वेळेआधी माघारी फिरण्याची शक्यता कमी असल्याचे अभ्यासकांचे म्हणणे आहे.

# दिशा पाटनीच्या घरावर गोळीबार, दोन कुख्यात गँगस्टरने घेतली जबाबदारी, स्वत:च सांगितलं हल्ल्याचं कारण

**मुंबई-** गुरुवारी रात्री उशिरा बरेली येथील बॉलिवूड अभिनेत्री दिशा पाटनीच्या घराबाहेर गोळीबार झाला. आता कुख्यात गँगस्टर गोल्डी ब्रार आणि रोहित गोदारा यांनी या हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे. दिशा पाटनीचे वडील, निवृत्त उपअधीक्षक जगदीश पटानी हे या घरात राहतात. पहाटे ४.३० च्या सुमारास, सिव्हिल लाईन्स येथे असलेल्या दिशाच्या वडिलांच्या घराच्या मुख्य दरवाजावर आणि भिंतीवर दुचाकीवरून आलेल्या दोन हल्लेखोरांनी चार-पाच राउंड गोळीबार केला. या हल्ल्यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. आता त्यांच्या घराबाहेर तात्काळ पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. तसेच, एसपी सिटी आणि एसपी क्राइम यांच्या नेतृत्वाखाली कारवाईसाठी पाच पथके तयार करण्यात आली. आता रोहित गोदारा आणि गोल्डी ब्रार टोळीने या हल्ल्याची जबाबदारी घेतल्याचे समोर आले आहे. या गँगने फेसबुक पोस्टमध्ये लिहिले आहे की त्यांनी दिशाची बहीण खुशबू पाटनीने प्रेमानंद जी महाराज आणि अनिरुद्धाचार्य यांच्याबद्दल केलेल्या कमेंटचा बदला घेतला आहे. पोस्टमध्ये धमकी देण्यात आली आहे की जर कोणी संत आणि धर्माविरुद्ध कमेंट केली तर त्याने परिणामांना सामोरे जाण्यास तयार राहावे. पण, आता ही पोस्ट डिलीट करण्यात आली आहे. पोस्टमध्ये असे म्हटले आहे की, भावांनो आज खुशबू पाटणी/ दिशा पाटणी यांच्या घरी झालेला गोळीबार ही एक कारवाई आहे. त्यांनी आमचे पूज्य संत प्रेमानंद



जी महाराज आणि अनिरुद्धाचार्य जी महाराज यांचा अपमान केला. त्यांनी आमच्या सनातन धर्माचे अवमान करण्याचा प्रयत्न केला. आमच्या पूज्य देवतांचा अपमान सहन केला जाणार नाही. हा फक्त एक ट्रेलर होते. पुढच्या वेळी जर कोणी किंवा त्यांनी आमच्या धर्माबद्दल अशाप्रकारची असभ्यता दाखवली तर आम्ही त्यांच्या घरात कोणालाही जीवंत सोडणार नाही.काही महिन्यांपूर्वी दिशा पाटणीची बहीण खुशबू हिने एक व्हिडिओ बनवला होता, ज्यामध्ये ती प्रेमानंद जी महाराजांशी बोलली असा दावा करण्यात आला होता. खुशबूने एक व्हिडिओ बनवला आणि प्रेमानंद यांच्याविरुद्ध तिने काहीतरी बोलल्याची बातमी देणाऱ्यांवर टीका केली. खुशबू म्हणाली होती की तिचा व्हिडिओ प्रेमानंद जी महाराजांसाठी नाही तर अनिरुद्धाचार्य यांच्याविरुद्ध आहे. अनिरुद्धाचार्य यांनी लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या महिलांवर कमेंट केली होती, ज्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. त्यावर खुशबू संतापली आणि तिने अनिरुद्धाचार्य यांना खूप सुनावले होते.

# शिरसाट यांचे खाते वादात

## ऊसतोड कामगारांच्या झालेल्या सर्वेक्षणासाठी पुन्हा काढले कंत्राट, प्रकरण काय?

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून सातत्याने वादाच्या केंद्रस्थानी असलेल्या संजय शिरसाट यांचे सामाजिक न्याय खाते पुन्हा एकदा अडचणीत येण्याची शक्यता आहे. राज्यातील ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षणाविषयी प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.महायुती सरकारने जून २०२५ मध्ये कामगारांचे सर्वेक्षण करण्यासाठी तब्बल २२ कोटी रुपयांचे कंत्राट जारी केले होते. मात्र, वर्ष २०२१ मध्येही अशाच प्रकारे सर्वेक्षण करण्यात आल्याची बाब उघडकीस आली आहे. याविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे तक्रार केली आहे. त्या तक्रारीची दखल घेत मुख्यमंत्री कार्यालयाने सामाजिक न्याय विभागाकडून उत्तर मागितले आहे.याविषयी सामाजिक न्याय विभागातील अधिकाऱ्यांना विचारले असता, चार वर्षांपूर्वी ग्रामसेवकांकडून करण्यात आलेले ओळखपत्रांचे काम हे तोकडे होते. केवळ अडीच लाखांच्या आसपास



कामगारांचे ओळखपत्र त्यातून तयार झाले. आता मात्र देण्यात आलेले कंत्राट हे कामगारांची विस्तृत माहिती जमा करण्याबरोबरच त्यांचे बँक खाते आणि इतर माहिती गोळा करण्यात येणार आहे.चार वर्षांपूर्वी ग्रामसेवकांकडून करण्यात आलेले ओळखपत्रांचे काम हे तोकडे होते. केवळ अडीच लाखांच्या आसपास कामगारांचे ओळखपत्र त्यातून तयार झाले. आता मात्र देण्यात आलेले कंत्राट हे कामगारांची विस्तृत माहिती जमा करण्याबरोबरच त्यांचे बँक खाते आणि इतर माहिती गोळा करण्यात येणार आहे. त्यामुळे दोन्ही कामे वेगळी असून त्यात पुनरुक्ती नाही.

# कोणत्या वयात आई होण्याचा निर्णय घेणं परफेक्ट आहे?

लग्न झाल्यावर काही वर्षांतच स्त्रियांवर बाळाच्या आगमनाची बातमी देण्याचा आग्रह सुरू होतो. मात्र असे निर्णय मागचा पुढचा विचार करून मगच घेतले पाहिजेत. कुणाच्याही दबावाखाली न येता ठरवलं पाहिजे की आपण शारीरिक मानसिक आणि भावनिकदृष्ट्या, खरंतर आर्थिकदृष्ट्याही, बाळासाठी तयार आहोत का? वैद्यकीय दृष्टिकोनातून विचार केला तर, स्त्रियांना मासिक पाळी सुरू झाल्यापासून ते जोपर्यंत पाळी बंद होत नाही, तोपर्यंत बाळ जन्माला येऊ शकते. जसजसं आपलं वय वाढत जातं, तसतशी प्रजनन क्षमता साहजिकच कमी होऊ लागते. आज आपण पाहू या की याबाबतीत तज्ज्ञ डॉक्टरांचं मत काय आहे.

**तज्ज्ञ काय सांगतात**

तज्ज्ञांचे म्हणणे आहे की गर्भवती होण्यासाठी सर्वोत्तम वेळ म्हणजे २० च्या दशकाच्या उत्तरार्धात आणि ३० च्या सुरुवातीच्या काळात. ही वयोगटातील श्रेणी स्त्री आणि बाळ दोघांसाठीही सर्वोत्तम परिणामांशी संबंधित आहे. खरं तर, या वयात मुलाला जन्म देण्यात सर्वात कमी गुंतागुंत असतात.

**प्रजनन क्षमता**

जैविक दृष्टिकोनातून सर्वोत्तम वय - २० ते ३० वयोगटातील महिलांमध्ये प्रजनन क्षमता सर्वाधिक असते. खरं तर, या दशकात महिलांची प्रजनन क्षमता शिखरावर असते. यावेळी, स्त्रीबीजे निरोगी असतात आणि गर्भधारणेची शक्यता जास्त असते.

**गुंतागुंत कमी असते**

या वयात गर्भपात, उच्च रक्तदाब, गर्भावस्थेतील मधुमेह यासारख्या समस्यांचा धोका कमी असतो. जर एखादी महिला या वयात गर्भवती राहिली तर बाळामध्ये जन्मजात दोष आणि अनुवांशिक विकारांचा



धोका देखील कमी असतो.

**३०-३५ वर्षे**

या वयानंतर, महिलांची प्रजनन क्षमता हळूहळू कमी होऊ लागते, परंतु तरीही हे वय सुरक्षित मानले जाते.३५ वर्षांनंतर (मातृत्वाचे वय वाढल्यानंतर): अंड्यांची गुणवत्ता कमी होऊ लागते, ज्यामुळे गर्भधारणेत अडचणी येऊ शकतात. तसेच, गर्भपात आणि जन्मजात विकार (जसे की डाउन सिंड्रोम) होण्याचा धोका वाढतो. कधीकधी (इन विट्रो फर्टिलायझेशन) सारख्या तंत्रांची आवश्यकता असू शकते.

**बदलणारा समाज**

हे एक विचित्र विडंबन आहे की महिलांसाठी आई होण्यासाठी आणि मुले वाढवण्यासाठी जे वय सर्वोत्तम मानले जाते ते वय त्यांच्या करिअरमध्ये पुढे जाण्याचे देखील असते. पण या काळात त्यांना अनेक गुंतागुंतींना तोंड द्यावे लागते.

पण आयव्हीएफ, एग फ्रीझिंग आणि इतर वैद्यकीय तंत्रांसारख्या वैद्यकीय प्रगतीमुळे, ३५-४० वर्षांच्या वयातही निरोगी गर्भधारणा शक्य होत आहे. त्याच वेळी, उशिरा लग्न आणि उशिरा कुटुंब विस्ताराचा ट्रेंड वाढत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# तातडीने माहिती काढा आणि मला कळवा

## मातोश्रीवरील हायव्होल्टेज बैठकीत उद्धव ठाकरेंचा एक प्रश्न, म्हणाले नंतर घोळ व्हायला नको...

**मुंबई :** नजीकच्या काळात होणार असलेल्या महापालिका निवडणुका आपल्या पक्षाने महाविकास आघाडीसोबत कायम राहात लढायच्या की महाराष्ट्र नवनिर्माण सेनेशी युती करून लढायच्या, याचा स्थानिक पातळीवरील ताकदीचा अंदाज घेऊन कळवा, अशा महत्त्वाच्या सूचना उबाठा पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी पक्षाच्या जिल्हाप्रमुखांना दिल्याचे खात्रीलायकरित्या समजते.उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील मातोश्री निवासस्थानी शुक्रवारी विदर्भ आणि मराठवाड्यातील जिल्हाप्रमुखांची महत्त्वाची बैठक बोलावली होती. या बैठकीत ठाकरे यांनी जिल्हाप्रमुखांना महत्त्वाच्या सूचना दिल्या.



जिल्हाप्रमुखांच्या या बैठकीत जिल्हा परिषद, पंचायत, नगर पंचायत, नगर परिषदेच्या निवडणुकांच्या तयारीबाबत चर्चा करण्यात आली. आपण महाविकास आघाडीसोबत लढावे की मनसेसोबत युती करावी याबाबत तातडीने निर्णय घ्यायचा असल्याने त्यादृष्टीने माहिती घ्या स्थानिक पातळीवरची ताकद ओळखून याबाबत काय निर्णय घ्यायचा याच्या सूचना करा आपली कुठे ताकद आहे, याबाबत मला माहिती द्या आघाडीसोबत निवडणूक लढवण्याबाबत काय मत आहे, ते लवकर मांडावे जेणेकरून आपल्याला वेळेत निर्णय घेता येईल - नगर पंचायत, पंचायत समितीच्या निवडणुका कधीही जाहीर होऊ शकतात. त्यामुळे कामाला लागा - मतदार याद्यांतील घोळ आताच तपासा आणि त्यावर प्रश्न विचारा, जेणेकरुन नंतर घोळ होणार नाहीत - १४ तारखेला भारत-पाकिस्तान विरोधात आंदोलन करा आणि महिला पदाधिकाऱ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सिंदूर पाठवा दरम्यान, ठाकरे बंधूंच्या भेटीगाठींमुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना युतीची चर्चा राज्यभरात रंगत आहे. त्यातच शुक्रवारी नाशिकमध्ये दोन्ही पक्षांच्या दुसऱ्या फळीतील नेत्यांसह कार्यकर्त्यांनी भव्य मोर्चाच्या माध्यमातून एकत्र येऊन अप्रत्यक्षपणे दोन्ही पक्षांच्या नव्या युतीचाच बिगुल फुंकला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी युतीबाबत एकमेकांच्या सुरात सूर मिळवत नाशिकसह राज्यात युतीचे संकेत दिले आहेत. दोन्ही पक्षांचे मूळ आणि कुळ एकच आहे. यापुढे नाशिकसह राज्यातील सर्व कार्यक्रम संयुक्त होणार आहेत. आता काय एकत्र येणे बाकी आहे? दोन भाऊ, नेते-कार्यकर्ते एकत्र आले असल्याचे शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी जाहीर केले.

## भारत-पाकिस्तानचे पहिल्या मॅचमध्ये विजय, पण पॉइंट्स टेबलमध्ये टॉपवर कोण, जाणून घ्या..

**दुबई :** भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघानी आशिया कप स्पर्धेतील आपले पहिले सामने जिंकले. पण दोन्ही संघांनी पहिले सामनने जिंकले असले तरी पॉइंट्स टेबलमध्ये अव्वल स्थानावर नेमका कोणता संघ आहे, हे आता समोर आले आहे. भारताने पहिल्या सामन्यात युएईवर दमदार विजय साकारला. भारतासाठी पहिला सामना सोपा ठरला. त्यामुळे भारताने पहिल्या सामन्यात दणदणीत विजय मिळवल्याचे पाहायला मिळाले. भारताने आपला पहिला सामना जिंकला. त्यामुळे आशिया कप स्पर्धेच्या पॉइंट्स टेबलमध्ये भारताची एंट्री झाली. कारण पहिल्या विजयानंतर भारताने दोन गुणांची कमाई केली.


पाकिस्तानने पहिल्या सामन्यात ओमानवर दमदार विजय साकारला. पाकिस्तानने टॉस जिंकला आणि प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पाकिस्तानच्या मोहम्मद हारिसने सात चौकार आणि तीन षटकारांच्या जोरावर ६६ धावांची धडाकेबाज खेळी साकारली. हारिसच्या या धमाकेदार फटकेबाजीच्या जोरावर पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करताना १६० धावांचा डोंगर उभारला. त्यानंतर पाकिस्तानने ओमानला ६७ धावांत ऑल आऊट केले आणि ९३ धावांनी दमदार विजय साकारला. या विजयानंतरही पाकिस्तानला दोन गुण मिळाले आहेत.सध्याच्या घडीला भारत आणि



पाकिस्तान या दोन्ही संघांचे एक-एक सामने झाले आहेत. प्रत्येकी एका सामन्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांचे समान दोन गुण आहेत. पण जेव्हा दोन्ही संघांचे समान गुण होतात तेव्हा नेट रन रेट पाहिला जातो. सध्याच्या घडीला भारताचा नेट रन रेट हा १०.४८३ एवढा आहे, तर पाकिस्तानचा या मोठ्या विजयानंतर नेट रन रेट हा ४.६५० एवढा आहे. त्यामुळे भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांचे समान गुण असले तर नेट रन रेटच्या जोरावर भारतीय संघ अव्वल स्थानावर आहे, तर पाकिस्तानला विजयानंतरही दुसऱ्या स्थानावर पॉइंट्स टेबलमध्ये समाधान मानावे लागले आहे.भारत आणि पाकिस्तान यांनी आशिया चषकातील आपले पहिले सामने जिंकले आहेत. दोन्ही संघांचे समान दोन गुण आहेत. त्यामुळे आता भारत आणि पाकिस्तान सामन्यात जो संघ बाजी मारेल, त्यांना अव्वल स्थानावर पोहोचण्याची संधी असेल.

## त्याने ब्रश केलं नव्हतं अन् तोंडाला लसणाचा उग्र वास... विद्या बालनने सांगितला उलटी येईल असा किसिंग सीनचा किस्सा

**मुंबई-** बॉलिवूड चित्रपटांमध्ये दाखवले जाणारे ग्लॅमर प्रेक्षकांना नेहमीच आकर्षित करते. कलाकारांमधील छोट्या छोट्या गोष्टीही खूप मनोरंजक असतात. बरेचदा हे कलाकार त्यांच्या इंटिमेट सीन्सचा अनुभव अगदी उघडपणे शेअर करतात. यातील काही अनुभव मजेदार असतात,



काही आश्चर्यकारक असतात आणि काही खूप माणुसकीचे क्षण असतात. अलीकडेच, प्रसिद्ध अभिनेत्री विद्या बालननेही तिच्या पहिल्या ऑनस्क्रीन किसिंग सीनपासून ते एका विचित्र अनुभवापर्यंत अनेक गोष्टी सांगितल्या आहेत.बॉलिवूड अभिनेत्री विद्या बालनने सांगितले की तिचा पहिला ऑनस्क्रीन किसिंग सीन प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेता संजय दत्तसोबत होता. ती अजूनही हा अनुभव खूप खास आणि संस्मरणीय मानते. तिने सांगितले की सीन शूट करण्यापूर्वी संजय दत्त तिला कम्फर्टेबल वाटावे म्हणून सकाळी लवकर भेटायला आला. संजय दत्त तिच्याशी मोकळेपणाने बोलला आणि दोघांनाही कम्फर्टेबल वाटेल असा सीन कसा करावा हे सांगितले. शूटिंगनंतर संजय दत्तने विद्याच्या कपाळावर प्रेमाने चुंबन घेऊन तिला प्रोत्साहित केले, ज्यामुळे विद्याची चिंता दूर झाली.विद्या बालनने आणखी एक मजेदार पण थोडा विचित्र अनुभवही शेअर केला. तिने सांगितले की एकदा तिचा सहकलाकार (ज्याचे तिने नाव सांगितले नाही) एका इंटिमेट सीनसाठी सेटवर आला होता, पण त्याने जेवणानंतर दात घासले नव्हते. विद्या म्हणाली की त्यांच्या तोंडाला लसूण आणि सोया सॉसचा उग्र वास येत होता, ज्यामुळे तिला तो सीन करणे खूप कठीण झाले होते. तथापि, तिने त्यावेळी तिच्या सहकलाकाराला मिंट्स किंवा काहीही दिले नाही कारण ती इंडस्ट्रीमध्ये नवीन होती आणि घाबरत होती. विद्या गमतीने म्हणाली की मला त्यावेळी आश्चर्य वाटले त्या अभिनेत्याला ही गोष्ट सांगायला त्याचा पार्टनरही नाही का?विद्याचे हे अनुभव बॉलिवूडचे वास्तव देखील दर्शवतात, जे अनेकदा पडद्यामागे लपलेले असते. नवीन कलाकारांना अनेकदा अशा कठीण विचित्र परिस्थितींना तोंड द्यावे लागते.

# लोकाभिमुख आणि पारदर्शक महसूल प्रशासनासाठी जिल्ह्यात १७ सप्टेंबरपासून सेवा पंधरवडा

जनसंचलन/बुलढाणा

महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक होण्यासाठी पंतप्रधान राष्ट्रनेता नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत जिल्ह्यात ङ्गसेवा पंधरवडाफ राबविण्यात येणार आहे. या सेवा पंधरवड्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी गुरुवारी पूर्वतयारीचा आढावा घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिजाउ कक्षात झालेल्या या आढावा बैठकीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशीव शेलार, मुख्य वनसंरक्षक सरोज गवस, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, डॉ. जयश्री ठाकरे, विविध विभागाचे प्रमुख, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकरी, तालुका आरोग्य अधिकारी (दुरदृष्य प्रणालीद्वारे) उपस्थित होते. या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी ङ्गसेवा पंधरवडा राबविण्याबाबची रुपरेषा स्पष्ट केले. हा ङ्गसेवा पंधरवडाफ तीन टप्प्यात राबविण्यात येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने पहिल्या टप्प्यात पाणंद रस्ते विषयक मोहीम, दुसऱ्या टप्प्यात ङ्गसर्वांसाठी घरेफ उपक्रम आणि तिसऱ्या टप्प्यात नावीन्यपूर्ण उपक्रम राबहवण्यात येणार आहेत. या पंधरवड्यातील उपक्रम यापूर्वीपासून सुरू असले तरी या कालावधीत त्यांची मोहीम स्वरूपात युद्धपातळीवर अंमलबजावणी करावी. यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान, जिवंत सातबारा मोहीम, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान, संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजना, लोकअदालत, धरती आबा अभियान प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त गावे, दत्तक गावे आणि तांडा समृद्धी योजनेंतर्गत गावांमध्ये जनजागृती कार्यक्रम, विविध शिबीर, रोजगार मेळावा, लोकअदालतीचे आयोजन करुन पात्र नागरिकांना शासकीय सेवांचा लाभ मिळवून द्यावा. या पंधरवडयायच्या सुरुवातीला लोकप्रतिनीधींच्या उपस्थित ग्रामसभा आयोजित करावी. विविध शिबिरांच्या माध्यामातून शेतकरी, नागरिकांना फार्मर आयडी, आयुष्मान कार्ड वितरित करावे. तसेच




ई-केवायसी, आधार नुतनीकरण, घरकुलाच्या रेतीसाठी ऑनलाईन नोंदणी या सुविधा तसेच लम्पी लसीकरण, टॅगींग, भोगवटादार जमीन वर्ग २ मधून वर्ग १ करणे आदी सुविधांचा लाभ मिळवून द्यावा. हा सेवा पंधरवडा यश्स्वीपणे राबविण्यासाठी उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकरी, तालुका आरोग्य अधिकारी, बँक व पोस्ट अधिकार यांनी समन्वयाने नियोजन करावे, अशा सूचना देखील जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी या आढावा बैठकीत दिल्या.

# नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित पिकांच्या नुकसानीपोटी७३ कोटी ९१ लाख ४३ हजाराच्या मदतीस मान्यता

जनसंचलन/बुलढाणा

राज्यात जून २०२५ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत अवकाळी पाऊस व अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीपोटी बाधितांना ७३ कोटी ९१ लाख ४३ हजाराच्या मदतीस राज्य शासनाने मान्यता दिली असून या बाबतचे शासन निर्णय जारी करण्यात आले असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले. मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले, नैसर्गिक आपत्तीत बाधित शेतकऱ्यांना मदत आणि दिलासा देण्यास शासनाने नेहमीच प्राधान्य दिले आहे. शासनाने बाधित पिकांचे तातडीने पंचनामे ही मदत देण्याच्या घेतलेल्या या निर्णयामुळे अतिवृष्टी व अवकाळी पाऊस या आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना उभारी मिळेल, असा विश्वास मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी व्यक्त केला. ही मदत देण्यास मान्यता देण्यात आलेल्या कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये जून २०२५ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे शेत पिकांच्या नुकसानीपोटी बाधितांना ३७ लाख ४० हजार रुपये तर नागपूर, वर्धा, चंद्रपूर, हिंगोली आणि सोलापूर जिल्ह्यात जून २०२५ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत शेत पिकांच्या नुकसानीपोटी ७३ कोटी ५४ लाख ३ हजार मदतीचा समावेश असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले.

.जून २०२५ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे शेत पिकांच्या नुकसानीपोटी रायगड जिल्ह्यातील ९८० बाधित शेतकऱ्यांच्या ५५.६५ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ११ लाख ८९ हजार रुपये, रत्नागिरी जिल्ह्यातील ५६० शेतकऱ्यांच्या ७१.५४ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १२ लाख ९६ हजार रुपये आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ३३५ शेतकऱ्यांच्या ५०.६४ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १२ लाख ६३ हजार रुपये असे १ हजार ८७५ शेतकऱ्यांच्या १७७.८३ हेक्टरवरील बाधित झालेल्या पिकांसाठी मदत म्हणून ३७ लाख ४० हजार रुपये इतक्या निधीस मान्यता देण्यात आली आहे. विभागीय आयुक्त नागपूर यांनी पाठवल्या २१ जुलै २०२५ च्या प्रस्तावानुसार नागपूर जिल्ह्यात जून २०२५ मध्ये १ बाधित शेतकऱ्याच्या ०.४० हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ९ हजार रुपये तर जुलै २०२५ मधील नुकसानीच्या मदतीसाठी १८ ऑगस्ट २०२५ रोजी पाठविलेल्या प्रस्तावानुसार नागपूर जिल्ह्यातील ७ हजार ४५० शेतकऱ्यांच्या ४५५९.६२ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ३९२.८३ लाख रुपये. वर्धा जिल्ह्यात जून २०२५ मध्ये ८२१ शेतकऱ्यांच्या ४८५.८० हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ४१.५४ लाख, तर जुलै २०२५ मधील नुकसानीच्या मदतीसाठी २ हजार ८२७ शेतकऱ्यांच्या २२२४.९१ हेक्टर




बाधित क्षेत्रासाठी १८९.२२ लाख, चंद्रपूर जिल्ह्यात जून व जुलै २०२५ मधील नुकसानीच्या मदतीसाठी १३ हजार ७४२ शेतकऱ्यांच्या ८६२१.०६ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ७३३.०० लाखाच्या मदतीचा समावेश आहे. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून हिंगोली जिल्ह्यात जुलै २०२५ मध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीपोटी मदतीसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार ३९६ शेतकऱ्यांच्या २१५ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १८.२८ लाखाच्या मदतीस मान्यता देण्यात आली आहे. विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडून सोलापूर जिल्ह्यात जुलै २०२५ मध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीपोटी मदतीसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार ५९ हजार ११० शेतकऱ्यांच्या ५६ हजार ९६१.७३ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ५९७९.१७ लाखाच्या मदतीस मान्यता देण्यात आली आहे.

# आरोग्य मंत्र्यांची दसरखेड प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट

जनसंचलन/बुलढाणा



सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी गुरुवारी शेगाव येथे संत गजानन महाराजांचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांनी मलकापूर तालुक्यातील दसरखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन नव्याने उभारलेल्या इमारतीची पाहणी केली आणि केंद्रातील चालू कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. आरोग्य केंद्रातील सुविधा पाहून आरोग्य मंत्र्यांनी समाधान व्यक्त केले आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक करत पुढील कामकाज अधिक प्रभावीपणे राबवाव्यात आणि आरोग्य सेवांचा दर्जा वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे निर्देश दिले. या प्रसंगी आरोग्य सेवा उपसंचालक वाघचौरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते, तालुका आरोग्य अधिकारी मलकापूर तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. यावेळी उपसंचालक यांनीही प्रत्यक्ष भेट देऊन केंद्राच्या कार्यपद्धतीबाबत मार्गदर्शन केले व समाधान व्यक्त केले. भेटीदरम्यान आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी वृक्ष लागवड कार्यक्रमात सहभाग घेतला आणि स्वतःच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पिकविम्या च्या अत्यल्प रकमेवरून रविकांत तुपकर आक्रमक..

**जनसंचलन/बुलढाणा**

शेतकऱ्यांना पिक विमा मिळण्यास सुरुवात झाली परंतु त्यामध्ये मोठा घोळ दिसून येत आहे. सन २०२४ चा पिक विमा आधीच उशिरा देण्यात येत आहे आणि त्यातही अनेक शेतकऱ्यांना १९ रुपये २४रु,७४रु,९०रु आणि शंभर रुपये अशी अगदी अत्यल्प आणि तुटपुंजी रक्कम मिळाली आहे. हा प्रकार म्हणजे शेतकऱ्यांचा अपमान असून भारतीय कृषी कंपनीने शेतकऱ्यांची थट्टा केली आहे, शेतकऱ्यांचा अपमान कदापिही सहन केला जाणार नाही अशी आक्रमक भूमिका घेत रविकांत तुपकर यांनी आज १२ सप्टेंबर रोजी मंत्रालयात अप्पर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी व कृषी विभागाच्या उपसचिव प्रतिभा पाटील यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. काही शेतकऱ्यांना समाधानकारक रक्कम मिळाली तर काही शेतकऱ्यांना अत्यंत तुटपुंजी रक्कम मिळाली, नेमक्या कोणत्या कायद्याने कोणत्या आधारावर ह्या रकमा देण्यात आल्या असाव्यात..?? असा संतप्त सवाल उपस्थित करून रविकांत तुपकर यांनी हा प्रश्न तातडीने मार्गे न लावल्यास आक्रमक आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिला. सन २०२४ चा पिक विम्याची रक्कम मिळण्यास सुरुवात झाली आहे. शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ह्या रकमा जमा होत आहे परंतु अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणारी रक्कम ही अत्यंत तुटपुंजी दिसून येत आहे. म्हणजे काहींच्या खात्यात १९ रुपये काहींच्या खात्यात २४ रु रुपये तर काहींच्या खात्यात ९० रुपये अशा रकमा जमा होत आहेत. ही नेमकी नुकसान भरपाई आहे की शेतकऱ्यांची थट्टा आहे असा आरोप करत रविकांत तुपकरांनी आज १२ सप्टेंबर रोजी मुंबई येथे अप्पर मुख्य सचिव विकास चंद्र दस्तगी यांना निवेदन दिले तसेच कृषी विभागाच्या उपसचिव प्रतिभा पाटील यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली व त्यांनाही निवेदन सादर केले. यावेळी चर्चा करताना रविकांत तुपकर यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम देताना दुजाभाव करण्यात आला आहे. एका शेतकऱ्याला चांगली रक्कम मिळाली तर त्याच्याच शेजारी असलेल्या शेतकऱ्याला मात्र ५० ते १०० रुपयांच्या आत मदत मिळाली हा प्रकार चुकीचा आणि रोष निर्माण करणारा आहे. पिक विमा कंपनीने विम्याची नुकसान भरपाई देताना कोणते निकष लावले हे जाहीर केले पाहिजे. एका शेतकऱ्याला भरीव नुकसान भरपाई देता तर त्याच्या शेजारच्या शेतकऱ्याला तोकडी मदत देऊन त्याच्या तोंडाला पाने पुसता हा प्रकार कदापिही खपवून घेतला जाणार नाही, पंचनामे करतानाच खूप मोठी गडबड विमा कंपनीच्या प्रतिनिधींनी केलेली आहे. पंचनामाच्या सर्वे फार्मवर कृषी सहाय्यक, ग्रामसेवक, सरपंच व शेतकऱ्याची स्वाक्षरी आवश्यक असते परंतु यांच्या स्वाक्षरी न घेता एआयसी विमा कंपनीच्या प्रतिनिधींनी परस्पर फार्म फिलअप केले आहे. हे सर्वे फॉर्म कृषी विभाग व शेतकऱ्यांना देणे बंधनकारक आहे परंतु या कंपनीच्या प्रतिनिधींनी सर्वे करतानाच घोटाळा केलेला असल्यामुळे सदर कंपनी हे फार्म कृषी विभागास देण्यास टाळाटाळ करीत आहे, असा आरोप देखील यावेळी रविकांत तुपकर यांनी केला. पंचनाम्याचे सर्वे फार्म जर समोर आले तर ड्डद्धदूध का दूध आणि पाणी का पाणीड्डड्ड होऊन या कंपनीचे पितळ उघडे पडेल या भीतीपोटीच सदरची कंपनी पंचनामा फार्म देण्यास टाळाटाळ करीत असल्याची बाब रविकांत तुपकर यांनी उपसचिव प्रतिभा पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली. ज्या शेतकऱ्यांना पीकविम्याची अत्यल्प व तुटपुंजी रक्कम मिळाली त्या शेतकऱ्यांना भरीव मदत द्या, अन्यथा कृषी विभाग आणि एआयसी कंपनीला आक्रमक आंदोलनाला सामोरे जावे लागेल असा कडक इशारा देखील यावेळी रविकांत तुपकर यांनी कृषी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिला. नियम आणि निकष सर्वांना सारखे पाहिजे परंतु कंपनीने वेगवेगळे नियम आणि मनमानी पद्धतीचे निकष लावून असंख्य शेतकऱ्यांना पिकविम्याच्या योग्य मोबदल्यापासून वंचित ठेवले आहे, यामुळे राज्यातील हजारो शेतकऱ्यांमध्ये रोष निर्माण झाला आहे. ही सर्व परिस्थिती पाहता यासंदर्भात तातडीची बैठक लावणे आवश्यक आहे. एआयसी पिक विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांना बैठकीला बोलवून ज्या शेतकऱ्यांना अत्यल्प पिक विमा मिळाला त्या शेतकऱ्यांचा प्रश्न निकाली काढा, अशी आग्रही मागणी यावेळी रविकांत तुपकरांनी लावून धरली. शेतकऱ्यांना मिळालेल्या अतिशय तुटपुंज्या पिक विम्याच्या रकमेवरून शेतकरी हवालदिल झाले असून रविकांत तुपकर यांनी आक्रमक आंदोलनाचा इशारा दिला आहे त्यामुळे आता तुपकर नेमकी कोणती आंदोलनात्मक भूमिका घेतात आणि त्यांचे आंदोलन काय वळण घेते याकडे सर्वांचे लक्ष लागून राहणार आहे..!

# किती सुंदर?डोळ्यांना सुख!...

## नाच रे मोरा..आंब्याच्या वनात नाही, लोणार सरोवरात!

**जनसंचलन/ लोणार**




मोर हा एवढा सुंदर पक्षी आहे की त्याला एकदाच पाहिलं तरी लोकांचा संपूर्ण दिवस सार्थकी लागतो. होय, डोळ्यांना सुख देणारा हा सुंदर प्राणी आपल्या नृत्य आणि सौंदर्यासाठी जगभरात प्रसिद्ध आहे. तो जेव्हा नाचतो तेव्हा त्याचा मनमोहक परफॉर्मन्स पाहण्यासाठी लोकांची पावलेही थांबतात. सोशल मीडियावर आपल्या भव्य आणि रंगीबेरंगी राष्ट्रीय पक्ष्याचे असंख्य व्हिडिओ आणि चित्रे आहेत. पण याच दरम्यान, लोक एक-दोनदा नाही तर पुन्हा पुन्हा पाहत असल्याची क्लिप समोर आली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील जगप्रसिद्ध असलेल्या लोणार सरोवर आणि अभयारण्य परिसरामध्ये विविध जाती प्रजातीचे पक्षी, प्राणी वास्तव्यास आहेत.त्यामध्ये मोरांची संख्या अधिक आहे. सरोवर परिसरात असलेली मंदिरे आणि सरोवराचे विहंगम दृश्य पाहण्यासाठी दररोज शेकडो पर्यटक भेटी देत असतात, याच परिसरात मनमुराद पणे नाचतानाचे मोराचे मनमोहक दृश्य पर्यटकांना पाहता आले.डोणगाव येथील रुषांक चव्हाण या पर्यटकाने नाचणाऱ्या मोराचा व्हिडिओ कॅमेरात कैद केला आहे. नागरिकांनाही या नाचणाऱ्या मोराचे मोठे आकर्षण असल्याने हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.

# आरोग्याशी खेळ चाले..! पॅथॉलॉजी डॉक्टरच्या रजिस्ट्रेशन नंबरचा गैरवापर!

**जनसंचलन/ खामगाव**



एका पॅथॉलॉजी डॉक्टरचा रजिस्ट्रेशन नंबर, सही आणि डिग्रीचा गैरवापर करून साताऱ्यातील लॅबमध्ये खोटे रिपोर्ट देण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी चौघांविरुद्ध खामगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील डॉ. ब्रम्हानंद टाले यांना नुकतेच बुलेट हेल्थकेअर सर्व्हिसेसकडून काही रिपोर्ट दाखवण्यात आले. तपासल्यावर त्यांच्या लक्षात आले की साताऱ्यातील साखरवाडी येथील धन्वंतरी लॅबच्या रिपोर्टवर त्यांच्या नावाचा, सहीचा आणि रजिस्ट्रेशन नंबरचा वापर करण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर बाजूला इतर व्यक्तींची नावे नमूद करून हा रिपोर्ट जणू अधिकृत पॅथॉलॉजिस्टने प्रमाणित केला असल्याचा भास देण्यात आला होता. डॉ. टाले यांनी तातडीने खामगाव शहर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दिली. पोलिसांनी या प्रकरणी डॉ. बी.जे. राऊत, विशाल एम. नाले (डीएमएलटी), शंकर खडसे (डीएमएलटी) व प्रतीभा एम. सोळुंके (डीएमएलटी) यांच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. नंतर हा गुन्हा फलटण ग्रामीण पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला. या प्रकरणी चौघांवर भादंवी कलम ३४, ४२०, ४६५, ४६८, ४७१ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# आरोग्य विभागाच्या पत्राला ग्रामसेवक जोशी यांनी दाखवली केराची टोपली!

**जनसंचलन/ जळगाव जामोद**

जळगाव जामोद तालुक्यातील सूनगाव ग्रामपंचायत ही स्वच्छतेच्या दृष्टीने उदासीन दिसत असून,सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले आहे. आरोग्य विभागाच्या पत्राला ग्रामसेवक जोशी यांनी केराची टोपली दाखविल्यामुळे ग्रामस्थ रोष व्यक्त करीत आहेत. ठिकठिकाणी पावसाच्या पाण्याची डबके साचलेले आहे. या साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती झालेली आहे व ठीक ठिकाणी गवत हे वाढलेले आहे. त्यामुळे डासांचे प्रमाण वाढलेले असून, सार्वजनिक आरोग्य धोक्यात आल्यामुळे उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.




ग्रामपंचायतने मागील दोन वर्षांपासून ग्रामपंचायत कडून तालुक्यातील बऱ्याच गावामध्ये धूर फवारणी केलीच नाही. सूनगाव ग्रामपंचायत कडून नागरिकांना आरोग्याच्या मूलभूत सुविधा पुरविण्यात येत नाहीत.. पिण्याचे शुद्ध पाणी मिळत नाही. दरम्यान या समस्येवर बोट ठेवले असता, आरोग्य विभागाने ८ सप्टेंबर रोजी ग्रामपंचायतला या संदर्भात उपाययोजना करण्यासाठी पत्र दिले परंतु ३ ते ४ दिवस होऊन ग्रामसेवक यांनी कोणतीच उपाययोजना न करता पत्राला सरळ केराची टोपली दाखविली आहे. यावर पंचायत समिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी योग्य ती कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८